<u>नियमित दिवाणी दावा क्र.३१९/२०१६</u>
<u>श्री. प्रभु नरसिंघाणी विरुध्द भगवानदास नरसिंनी तर्फे वारस</u>
<u>निशाणी क्र. ५९ वरुन</u>

**वादीतर्फे साक्षीदार क्र.३ चा उलटतपास प्रतिवादीचे विधिज्ञ श्री.एस. भोजवानी यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

मी प्लॉट नं.२३२, शिवधाम मंदीरच्या मागे, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे १७ या ठिकाणी राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पुराव्याचे शपथपत्र वादी प्रभु नरसिंगानी यांचे सांगणेवरुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्यातील शपथपत्रातील मजकुर वादी यांच्या विधिज्ञांच्या सांगण्यावरुन नमुद करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी यास पूर्वीपासुन ओळखत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, तो गेले ४० वर्षापासुन वादीला ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत वादीच्या वडिलांनी खरेदी घेतली होती हे मला वादींनी सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत संदर्भातील वाद मिळकत कोणाच्या नावे आहे या संदर्भातील मी आजपर्यंत कोणताही दस्त ऐवज पाहिलेला नाही. मी वादीला वाद मिळकती संदर्भातील दस्त ऐवज पाहण्यास मागितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीमध्ये वादीचा ताबा आहे ही बाब मला वादी याने सांगितली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने वाद मिळकतीमध्ये गाई म्हशी व गोठा असलेबाबत मला वादीने सांगितले आहे.

२. मला सदर प्रकरणामध्ये कोण कोण प्रतिवादी आहे याबाबत माहिती आहे. प्रतिवादीमध्ये भगवानदास नरसिंगानी, पुष्पा नरसिंगानी, राकेश नरसिंगानी व गिरीश नरसिंगानी असे प्रतिवादी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या दाव्यातील प्रतिवादींची नावे मला वादीकडुन समजली. मला सदर प्रकरणातील प्रतिवादी संदर्भातील माहिती वादीने सांगितलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील प्रतिवादी वाद मिळकतीमध्ये कधीही राहिलेले नाहीत असे नमुद असलेले कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्रातील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमुद केलेला मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी वाद मिळकतीमध्ये १०० चौ.फुट जागेत ताबा असलेबाबत मला वादीकडुन समजले आहे. प्रतिवादी चंदुमल नरसिंगानी हा वाद मिळकतीमध्ये दुकान चालवित आहे हे माझे शपथपत्रामध्ये मी नमुद केलेले आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो गेली दोन वर्षापर्यत तो दुकान चालवित होता परंतु मागील एक वर्षापासुन तो आजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीमधील दुरुस्ती व वादी व्यवसाय चालवितो सदरची बाब मला वादीकडुन समजली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी हे व्यवसायामध्ये वाद मिळकतीमध्ये कोणतीही पैसे देत नाहीत या संदर्भातील बाब मला वादीकडुन समजली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःहुन वादी यांच्या कौटुंबिक कार्यक्रम जो वाद मिळकतीवर करण्यात

येतो त्या ठिकाणी मी गेलेलो नाही.  हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत ही एकत्र कुटुंबाची मिळकत म्हणून उपभोगण्यात आलेली आहे ही बाब मला वादीकडुन समजली आहे.  हे म्हणणे खरे आहे की, मी वादी यास मदत व्हावी त्याचे सांगणेवरुन प्रकरणात साक्ष देत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मला साक्ष देणेकामी वादीने काही लालच दिलेली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेली साक्ष ही माझे स्वतःच्या माहितीवर दिलेली नाही.  हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याचे शपथपत्र तयार होते त्यावर मी केवळ सही केलेली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृत,

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN

Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2026.01.20 11:33:13 +0530

पिंपरी, पुणे
दिनांक :–१९/०१/२०२६

(एस.एस.चव्हाण)
दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,
पिंपरी, जि. पुणे